८५ वर्षांची पत्रकारितेची परंपरा
उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी
स्थापना १९३८

# लोटस पोदार स्कूलमध्ये सायबर शिक्षा फॉर सुरक्षा कार्यशाळा

**उमरगा |** उमरगा शहरातील लोटस पोदार लर्न स्कूल येथे क्लिक हील फाऊंडेशन कंपनी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हा स्तरावर सचिव म्हणून नियुक्त प्रतिक्षा रमेश पांगे यांची सायबर शिक्षा फॉर सुरक्षा या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. प्राचार्य श्रीकांत वारुडे, उपप्राचार्य अतुल फावडे व समन्वय विभावरी थिटे, प्रतिक्षा पांगे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रतिक्षा पांगे यांनी सायबर गुन्हे, सोशल मीडिया,मोबाईल प्लिकेशन यातून सायबर क्राईम, होणारी अर्थिक फसवणूक या समस्या कशा निर्माण होतात, याचे ज्वलंत उदाहरणावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर यातून आपण, आपले कुटुंब व समाज कसे सुरक्षित राहू शकते याची माहिती उपस्थितांना आपल्या मार्गदर्शनातून दिली. ही कार्यशाळा प्रशालेत इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली होती. यामुळे विद्यार्थ्यांना मोबाईल फोन, सोशल नेटवर्किंग,वेब साईट वापर यातील समस्या व उपाययोजना याबद्दल यथोचित माहिती मिळाली. सुत्रसंचलन दुर्गानाथ देशमुख  तर आभार सहशिक्षक धिरज जाधव यांनी मानले.